

संत शिरोमणी
**रविदास महाराज**

मन चंगा तो कठोती में गंगा !

संपादकीय सल्लागार : मा. पंढरीनाथ पवार

ई–मासिक

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र

# अधिकृत RCM



आशिर्वाद

मा.श्री.बबनराव (नाना) घोलप
माजी समाजकल्याण मंत्री, महाराष्ट्र

adhikrutrcm@gmail.com

वर्ष : १, अंक : ४, डिसेंबर २०२०, पाने : ४

संपादक : **डॉ. शांताराम पां. कारंडे**


**कह रैदास तेरी भगति दूरि है, भाग बड़े सो पावै**
**तजि अभिमान मेटि आपा पर, पिपिलक हवै चुनि खावै**

ईश्वरभक्ती मोठ्या मुश्कीलीने प्राप्त होते. मनात जराही अभिमान केल्यास सारे व्यर्थ होऊ शकते. जसा बलाढ्य शरिराचा हत्ती साखरेचा दाणा उचलू शकत नाही आणि त्या गोडीला मुकतो, पण लहानशी मुंगी मात्र तो साखर दाणा सहज घेऊन जाते आणि लाभार्थी होते.

## महासंघाचे मुंबईत दिवाळीनिमित्त मोफत फराळ वाटप









**नाशिक (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, क्रांतिकारी नेते, चर्मकार हृदयसम्राट मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या आदेशान्वये लॉक डाऊनच्या पार्श्वभूमीवर गरीब गटई चर्मकारांचा दिवाळी सण गोड साजरा व्हावा या हेतूने संपूर्ण मुंबईतील १०० चर्मकारांना मोफत दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. सदर वाटप राष्ट्रीय सल्लागार मा.पंढरीनाथ पवार, राष्ट्रीय सचिव श्री. उमाकांत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश कार्याध्यक्ष मा. डॉ. शांताराम कारंडे व मुंबई विभागीय अध्यक्ष श्री. राजेश खाडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी मुंबईतील प्रचार व प्रसार विभागीय सल्लागार श्री. जगदीश लाड, उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष श्री. दादाभाऊ माने, श्री. दीपक माने व इतर चर्मकार बांधव उपस्थित होते. या मोफत फराळ वाटपाचे आयोजन डॉ. शांताराम कारंडे व श्री. राजेश खाडे यांच्या तर्फे करण्यात आले होते.

## महासंघाचे ज्येष्ठ नेते सुंदर बापू तुपे यांचे निधन



**अहमदनगर (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे ज्येष्ठ समाजनेते व आदरणीय नानासाहेब घोलप यांच्या सोबत संघटना स्थापनेपासून कार्यरत असणारे नानांना समर्थ साथ देणारे विश्वासू सहकारी तसेच समाजातील आदरणीय असे राष्ट्रीय चर्मकार महासंघ, संघटनेचे सुंदरबापू तुपे यांना गुरुवार दि. १२/११/०२० रोज़ी दुपारी ३.४५ वाजता देवाज्ञा झाली. सदर घटना अत्यंत दुःख असून देव त्यांच्या आत्म्यास शांती प्रदान करो, ही संत रविदास महाराजांचे चरणी प्रार्थना. त्याचप्रमाणे तुपे कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची सहनशक्ति लाभो. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे सर्व राष्ट्रीय, राज्य, जिल्हा, तालुका पदाधिकारी व समाज बांधव तूपे कुटुंबियांसोबत आहेत. समाजातील अनेक मान्यवरांनी सुंदर बापू तुपे यांच्या अकाली निधनाबाबत शोक व्यक्त केला आहे.

### चर्मकार महिलांवरील अत्याचार प्रकरणी नराधमांना फासावर लटकवा!

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाची मागणी

**लातूर (प्रतिनिधी) :**

कोल्हापूर आणि जळगाव जिल्ह्यात घडलेल्या चर्मकार मुलीवर अत्याचार प्रकरणी नराधमांना फासावर लटकवा अशी मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात चर्मकार समाजाच्या मुलीवर कोल्हापूर जिल्ह्यात राधानगरी तालुक्यात २० वर्षीय मुलीवर अत्याचाराची घटना घडली असून जळगाव जिल्ह्यात पारोळा तालुक्यात २० वर्षीय तरुणीवर बलात्कार करुन विष पाजून खून करण्यात आला आहे.

कोल्हापूर आणि जळगाव या दोन जिल्ह्यात अत्याचाराच्या घटना घडल्या असून एका मुलीचा प्राण गेला या घटनेने महाराष्ट्र हादरला असून निंदनिय घटनेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करीत आहोत.



आरोपींना कडक शासन करुन लवकरात लवकर फासावर लटकवा अशी मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर, जिल्हाध्यक्ष बिभीषण सांगवीकर, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष धर्माजी उदबाळे, शहराध्यक्ष रवि कुरील, सामाजिक कार्यकर्ते बालाजी साबळे सचिव प्रविण नाबदे, माजी जिल्हाध्यक्ष अनिल कबाडे, बाबुराव कांबळे, शिवाजी दामावले, धोंडीराम सुर्यवंशी, विलास सोनवणे, चंद्रकांत कांबळे, सचिन सुरवसे यांनी कैली आहे.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे कोविड योध्दा म्हणुन प्रतिभा रेवसकर यांचा सन्मान

**अमरावती (प्रतिनिधी) :**

अचलपुर उपजिल्हा रुग्णालयात १७ दिवस कोविड रुग्णालयात परिचारिका सौ.प्रतिभा सुनिल रेवस्कर यांनी सेवा देत निष्ठेने आपले राष्ट्रिय कर्तव्य पार पाडले असता राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याणमंत्री बबनराव घोलप यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत कोरोना योद्धा म्हणून त्यांना सन्मानपत्र देऊन जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन नानासाहेब यांच्या आदेशाने ते सन्मानपत्र,शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सौ.प्रतिभा रेवसकर यांच्या निवासस्थानी जाऊन यथोचित गौरव केला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून अचलपुर तालुका अध्यक्ष मनोहर कोथळकर,अचलपुर शहर अध्यक्ष उमेश गायकवाड हे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर अध्यक्ष अनिल घोरे यांनी तर संचालन परतवाडा शहर सचिव डॉ.गजानन रेवसकर यांनी केले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घरात रहा सुरक्षित रहा असे आवाहन प्रशासन सामान्य जनतेला करीत असतांना डॉक्टर,पोलीस,सामाजिक कार्यकर्ते मात्र कोरोनावर मात करण्यासाठी सतत कार्यरत असतांना अचलपुर उपजिल्हा रुग्णालय येथील परिचारिका सौ.प्रतिभा रेवस्कर यांनी १७ दिवस कोविड रुग्णालयात कर्तव्य पार पाडून यांनी




चर्मकार समाजाचे नाव उंचावले.याकरिता राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करीत कृतज्ञता व्यक्त केली.

# संपादकिय

## आता तरी जागे व्हा !!!!!

**आज ज्यांचे वय ६० पेक्षा अधिक आहे, त्यांनाच विचारा की, पूर्वी गाव खेड्या – पाड्यात वास्तव्यास असणाऱ्या आपल्या समाज बांधवांच्या मागील पिढीची अवस्था काय होती ? व आज आपली पिढी काय अवस्थेत आहे ? आणि पुढच्या पिढीला कसे दिवस येणार आहेत? आणि आज आपण जे दिवस अनुभवत आहोत ते कुणामुळे? याचा जरा आपण गांभिर्याने विचार करणार आहोत की नाही ? की पुन्हा एकदा मागचे दिवस आपल्या पुढच्या पिढीला दाखविणार आहोत! आपण किती कृतघ्न आहोत. केलेल्या उपकाराची जरा तरी जाण आपणास आहे का?**

आपण जाण ठेवावी म्हणून त्यांनी आपल्यासाठी करून ठेवले नाही तर त्यांना आपल्या अठरा पगड जातीतील समाज बांधवांनी जे हाल अपेष्टा अनुभवल्या आहे, जनावरापेक्षाही हिन वागणूक माझ्या दलीत व अठरा पगड जातीतील समाज बांधवांना भोगाव्या लागल्या आहेत म्हणून त्यांच्या मनाला दलित समाज बांधवांचे दुःख पाहवले नाही. सर्वांना जन्म देणारी माता म्हणून तिचे पुजन करण्याऐवजी तिला शिक्षणापासून वंचित ठेऊन तिची हेटाळणी केली जात होती. स्त्रीला शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी तीला समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण दिले त्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला, महिलांना त्यांचे सामर्थ्य दाखविता यावे म्हणून आपल्या जिवाची–अपमानाची पर्वा न करणारी माता सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांना तुम्ही आम्ही पुर्णपणे फसविले आहे. त्यांना जरी आपण फसविले असले तरी त्यांच्यावर त्याचा काही एक परिणाम होणार नाही पण आपणच आपल्या पुढच्या पिढीला पुन्हा एकदा मागील दिवस घेऊन येण्यास कारणीभूत ठरणार आहोत. आता खऱ्या अर्थाने समाजाला योग्य दिशा देण्याची वेळ ठेपली आहे.

संत रविदास महाराज यांच्या क्रांतिकारी व वैज्ञानिक विचाराला समाज बंधू भगिनींनी मुठमाती दिली आहे. म्हणून जो पर्यंत आपण महिला वर्गाला यातून बाहेर काढत नाही तो पर्यंत आपला समाज कधीच विकसित होणार नाही हे समाजात काम करणाऱ्या समाजनेत्यांनी मनांत खुण गाठ बांधली पाहिजे. कोणावरही श्रध्दा असावी पण ती आंधळी अंधश्रद्धा नसावी, माणसाने निर्माण केलेला देव हा आम्हाला काहीच देत नाही. तो जे देतो ते दिसत असूनही आपण न दिसल्यासारखे करतो. तो नानाविविध प्रकारे निसर्गाच्या रुपाने आपल्या समोर उभा आहे. आज आपण पाहातो कोरोनाचे मोठे संकट संपूर्ण जगासमोर उभे राहिले, पण कोणत्याही मंदिरातला देव ते निवारण करण्यासाठी पुढे आला नाही. परंतु विविध प्रकारे सेवा करणाऱ्या डॉक्टर्स, नर्स, पोलीस व समाजसेवक अशांच्या रूपाने तो येऊन मदत करून गेला. मंदिरात देव हा प्रतिमेच्या रूपाने असून त्याची खरी प्रतिभा ही निसर्गाची सेवा करणाऱ्याच्या रूपाने आपणास नियमित दर्शन देत असते. परंतु दुर्दैवाने ती आपल्याला डोळ्याने दिसत नाही.

माझ्या समाज बंधू आणि भगिनींनो, मी पुन्हा एकदा आपणास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळ मंत्राची आठवण करून देतो.... शिका...... ! संघटित व्हा.....!! आणि संघर्ष करा !!! तरच आपल्या पुढच्या पिढीला भवितव्य आहे हे नीट लक्षात असू द्या. आता मोठेपणा बंद करून लग्नात होणार अवाढव्य दिखाऊपणा करणारा खर्च कमी करा, पुजा घालत बसू नका, नवस करणे व तो फेडणे हे बंद करा, कारण धर्मावर खर्च करण्यापेक्षा मुला मुलींच्या शिक्षणावर खर्च करा. नवनविन व्यवसाय सुरू करा. आता सरकार खाजगीकरण करीत आहे त्यामुळे खाजगी क्षेत्रात नौकरी करावी लागणार व पगार कमी मिळणार आहे, त्यामुळे शहरात राहण्यास घर नसेल तर भाडे व घरखर्च भागणार नाही, आता खेड्यातुन शहरात येत होतो आता शहरातून खेड्यात जाण्याची वेळ येणार आहे म्हणून म्हणतो आता तरी जागे व्हा!!

जित्या पितरा नेदी अन्न ! मेल्यावरी पिंडदान ।।<br>
विद्या विना मती गेली ! मती विना निती गेली ।।<br>
निती विना गती गेली ! आणि गती विना वित्त गेले ।।<br>
वित्ता विना शुद्र खचले ! इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।<br>
शेंदरी हेंदरी दैवते ! कोण पुजी भुते खेते ! आपुल्या पोटे जी रडते !<br>
शिते मागती अवदान !<br>
नवसे कन्या पुत्र होती ! तरी का करणे लागे पती !!<br>
ब्राह्मण मुहूर्त सांगती ! तरी का बाल विधवा होती !!<br>
जित्या जिवा करूनी वध ! दगडा दाविती नैवेद्य !!

वरील सर्व महाराष्ट्रातील संताचे पुरावे आहेत. महात्मा जोतिबा फुले यांनी सत्य सांगीतल्यावर देखील आपणास समजत नसेल तर काय **म्हणावे** ? असा प्रश्न मला पडला आहे. संत शिरोमणी रविदास महाराज यांना देखील हे कर्मकांड मान्य नव्हते. पुर्वश्रमीचे आपले बांधव यांनी अनिष्ट चालीरीती, रूढी व परंपरांना यांचा त्याग करून शिक्षणावर भर दिल्याने ते आज मोठ्या प्रमाणात मोठ्या पदावर आहेत. पण आपण आपला परंपरागत व्यवसाय व पोटा पुरती नौकरी याच्या पुढे जात नाही म्हणून आता तरी आपण जागे झाले पाहिजे !!



**पंढरीनाथ पवार**
राष्ट्रीय सल्लागार
राष्ट्रीय चर्मकार महासंघ
■ 98202 58049

लहानपणापासून आपल्या समाजात परंपरेचे अंधश्रध्देचे, देवाधर्माचे इतके डोस पाजले जातात की, ती व्यक्ती मोठी झाल्यावर त्यांच्या पूर्णपणे आहारी गेलेली असते. एखाद्या अमली पदार्थासारखा हा विषय त्यांच्या मनात आणि शरीरात भिनला जातो.

# आता विचार करावाच लागेल!

**आम्हाला जसे कळायला लागते तेव्हापासुन सुरस चमत्कारांनी ठासुन भरलेले रामायण, महाभारत, कुरआन, बायबल हमखास शिकवले जाते. परंतु इतर देशात आणि खास करून जपान मध्ये बालवाडीतील मुलांना Why म्हणजेच (का ?) या नावाचे पुस्तक शिकविले जाते. व मोठा झाल्यावर कुठल्याही घटनेचे कारण शोधण्यासाठी दिलेल्या उत्तराला पाच वेळा स्वतः ला का म्हणून विचारल्यास त्याचे खरे कारण मिळते असा सिद्धांत आहे, त्यामुळेच जपान मध्ये टेक्नॉलॉजी झपाट्याने विकास करू लागली. आणि भारतात मात्र धार्मिक कर्मकांड आणि अंधश्रध्दांमुळे आमच्या मेंदूला कुलूप घातले गेले.**




आर या पार

डॉ. शांताराम कारंडे

म्हणूनच १०० किलो वजन असणारा, ६ फुट उंच असणारा, एका बुक्कीत नारळ फोडू शकणारा मनुष्य , हळद–कुंकु लावालेलं छोटसं लिंबू रस्त्यात पडलेलं दिसलं की घाबरतो. कारण आम्हाला why हा प्रश्न विचारण्याचा अधिकारच नाही. किंवा ती चौकस बुध्दी पद्धतशीरपणे खुरटवण्यात आली असावी. आम्ही गप्प बसा, प्रश्न विचारू नका, या संस्कृतीत वाढलो आहोत आणि आमच्या पुढच्या पिढीलाही वाढवत आहोत.

मात्र, आता हे चित्र बदलायलाच हवे. मुलांनी Why म्हणायला शिकायलाच हवे. म्हणून आम्हाला धर्मांधतेवर टिका करावी लागते. त्याचबरोबर सर्वसामान्य माणसांच्या वाटेत परंपरेच्या, धर्माच्या, जातीच्या, पोटजातीच्या आणि वर्चस्ववादी वृत्तीच्या घातक मानसिकतेचे काटे अंथरण्याचे काम युगानुयुगांपासून कोण करीत आहे हे दाखवून देण्याचे प्रामाणिक काम (लोकांच्या दृष्टीने अप्रिय काम) करावे लागते.



इतिहासात व वर्तमानात हे बदण्याचे प्रयत्न सर्व जाती धर्मातील अनेक विविध संतांनी महात्म्यांनी, नव धर्म निर्मात्यांनी प्रयत्न केले परंतु समाज कंटकांनी त्यांच्या ही संप्रदायात घुसखोरी करुन शेवटी त्यांचे लिखाण कर्मकांडातुन अंधश्रद्धेकडेच नेऊन ठेवले !

त्यातील खऱ्यांना जलसमाधी दिली नाहीतर गाडून समाधी घेतलेली दाखवून त्यांना डायरेक्ट स्वर्गातुन विमानच आणायला जाते !!

भारतातील प्रत्येक माणूस हा अंधश्रद्धेने निर्माण झालेल्या (केलेल्या) अज्ञानामुळे अर्धा मेलेला आहे. अज्ञान रुपी अंधाराच्या सनातनी अग्रदूतांना हेच कदाचित पटत नसावे म्हणून पराकोटीचा तिरस्कार या व्यक्ती नेहमी करत असतात आणि त्यासाठी त्या कुठल्याही थराला जावून संस्कारहीन पातळी गाठतात.

लहानपणापासून आपल्या समाजात परंपरेचे अंधश्रध्देचे, देवाधर्माचे इतके डोस पाजले जातात की, ती व्यक्ती मोठी झाल्यावर त्यांच्या पूर्णपणे आहारी गेलेली असते. एखाद्या अमली पदार्थासारखा हा विषय त्यांच्या मनात आणि शरीरात भिनला जातो. ते स्वत: काही विचारच करू शकत नाहीत कारण त्यांना ह्या गोष्टीची भोंदूबाबा, बूवा, साधू, महाराज तसेच धर्मवेडे यांनी इतकी भिती घातलेली असते की, इकडे आड तिकडे विहीर, धरलं तर चावते सोडलं तर पळते अशी बिचाऱ्यांची अवस्था होते. अशा परीस्थितीतून तुमच्या आमच्या सारखा विचारांनी त्या बुरसटलेल्या संस्कारांवर मात करून एखादाच बाहेर पडू शकतो.

पण बऱ्याच लोकांच्या बाबतीत विचार करण्याची क्षमता प्राप्त झाल्यावरही त्यांना धर्माच्या कचाट्यातून बाहेर पडणे दुरापास्त होते; एवढे ब्रेन वॉशिंग त्या अजाणतेपणी झालेले असते. म्हणून मूल वाढवतांना त्याला जरी सर्व धर्मांची माहीती दिली, तरी त्याच्यावर आपल्याच धर्माचे रोपण करण्याऐवजी सज्ञान होईपर्यन्त विचार करायला वाव द्यायाला हवा. आणि तदनंतर त्यालाच ठरवू द्यावे कोणत्या धर्माचा स्विकार करायचा वा निधर्मी राहायचे ते. ह्यालाच व्यक्ती स्वातंत्र्य देणे मानतात. हेच खरे पालकत्व असे मला वाटते !

आजचे जगातील अर्ध्यापेक्षा जास्त शोध हे भारतवर्षात हजारो वर्षापूर्वीच लागलेले आहेत अशी आपण शेखी मिरवतो! हे खरेही असेल तरीही आज आपण टेक्नॉलॉजीसाठी जगावर अवलंबून का? या Why चे उत्तर हे यातच दडले आहे मधल्या काळात ९८ % भारतीयांना शिक्षणाचा अधिकार न ठेवल्यामुळे त्या शोधांचा विकास कसा हौईल !!! त्याच्या झळा आता आपण सर्वच भोगत आहोत..!

मोबाईल नं. ९८२०१ ५८८८५
dr.shantaramkarande@gmail.com

संपादक मंडळ

■ **पंढरीनाथ पवार** संपादकीय सल्लागार ■ **डॉ.शांताराम कारंडे** संपादक ■ **जयवंत बामणे** कार्यकारी संपादक
■ **सहसंपादक :** रविंद्र राजुस्कर, दत्तात्रय गोतिसे, रोहीदास बनसोडे, डॉ गणेश बोरकर, मारुती शिवदास
■ **उपसंपादक :** श्रीमती सरोज बिसुरे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर,

हे ई–मासिक वृत्तपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मुद्रक, संपादक डॉ.शांताराम कारंडे यांनी प्रकाशक मे. सिध्दांत प्रकाशनातर्फे २२१/६, गीतगुंजन, सेक्टर–२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई– ६७ येथून डिजिटली प्रकाशित केले. संपादकीय सल्लागार : पंढरीनाथ पवार email : adhikrutrcm@gmail.com (अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

# रा. च. महासंघाची जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

**दलित महिलांवर होत असलेल्या अत्याचाराच्या घटनेचा निषेध नोंदवून कारवाई करण्याची मागणी.**




**अहमदनगर (प्रतिनिधी) :** कोल्हापूर व जळगाव येथे दलित महिलांवर होत असलेल्या अत्याचार विरोधात निषेध नोंदवून राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे निदर्शन करण्यात आली यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र बुंदेले समवेत जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब लोहकरे, युवा जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब केदारे, शहर जिल्हाध्यक्ष संतोष उदमले, शहर उपाध्यक्ष प्रशांत डहाळे, विकी गारदे, चिनूलाल बुंदेले, दुर्वेश शेलार, गजानन शेंदुरकर, संभाजी आहेर, प्रितिश सूर्यवंशी, खेमराज बुंदेले, सचिन वाघमारे, लक्ष्मण साळे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रात चर्मकार समाजाच्या मुलीवर अत्याचाराच्या दोन घटना नुकत्याच घडलेल्या आहेत त्यामुळे एका मुलीचा प्राण गेलेला आहे या घटनेचा आम्ही तीव्र संताप व्यक्त करीत जाहीर निषेध करण्यात आला.

कोल्हापूर येथे चर्मकार समाजातील वीस वर्षीय तरुणीवर दोन नराधमांनी अत्याचार केला त्या तरुणीला विवस्त्र करून तिचा व्हिडिओ काढला या आरोपींना पोलिसांनी अटक केली असून पोलिस कोठडी दिलेली आहे तरी अशा माणुसकीला काळीमा फासणाऱ्या नराधमांना जास्तीत जास्त कडक शिक्षा झाली पाहिजे अशी प्रामुख्याने राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.

तसेच जळगाव येथील विद्यार्थ्यांचे अपहरण करून तिला कासोदा येथे नेत नराधमांनी सामूहिक बलात्कार केला त्यानंतर तिला जबरदस्तीने विष पाजून ठार मारण्याचा प्रयत्न केला जबर जखमी झालेल्या तरुणीला बसस्थानकाच्या मागे फेकून देऊन नराधमांनी डाव साधला शेवटी उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मावळली या घटनेमुळे जळगाव जिल्हासहित संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. या दोन्ही दुर्दैवी घटनांमुळे राज्यात चर्मकार समाजामध्ये प्रचंड संताप निर्माण झाला असून उच्चवर्णीय कडून होणाऱ्या बलात्कारासारख्या गंभीर घटनेचे पडसाद राज्यभर समाजामध्ये उमटत आहे या दोन्ही घटनेचा तीव्र शब्दात निषेध करीत तसेच प्रशासन व शासन यांच्याशी अशा घटना घडू नयेत अशी उपाययोजना आखावी व असे प्रकार करण्याअगोदर आरोपींना धडकी बसेल असा कडक कायद्याची अंमलबजावणी करावी अन्यथा असेच प्रकार घडत राहिले तर राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा क्रांतिकारी नेते माजी समाजकल्याण मंत्री बबनरावजी घोलप यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरावे लागेल असे निवेदनात म्हटले आहे.

**राष्ट्रीय चर्मकार महासंघाची मागणी**

# कु. नीलिमा सावंत यांच्या बलात्काऱ्यांना फाशीची शिक्षा द्या!



**जळगाव :** जिल्ह्यातील तालुका टोळ पारोळा या गावात महाराष्ट्राला काळिमा फासणारी घटना घडली. कुमारी नीलिमा ही दिवाळीनिमित्त आपल्या मामाच्या गावी पारोळा येथे गेली असताना तेथील काही गाव गुंडांनी तिच्यावर सामूहिक अमानुष बलात्कार करून तिला विष पाजून गावातील बस स्थानकाशेजारील अडगळीत टाकून दिले. नंतर त्या मुलीला उपचारासाठी दाखल करण्यात आले व तिचा दुर्दैवी अंत झाला. चर्मकार समाजावर झालेली ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. राष्ट्रीय चर्मकार महासंघ या घटनेचा जाहीर निषेध करत आहे.

कुमारी नीलिमा सावंत तिच्यावर सामुहिक बलात्कार करणाऱ्या आरोपींना खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून लवकरात लवकर आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. कु. नीलिमा सावंत हिच्या कुटुंबाचे पुनर्वसन शहरात करण्यात यावे व त्यांना पोलिस संरक्षण देण्यात यावे. ज्या पोलिसांनी कुमारी नीलिमा सावंत हिचा मृत्यूपूर्व जबाब घेतला नाही त्या सर्व पोलिस कर्मचाऱ्यांसह आरोपी करून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.

तसेच दुसरी दुर्दैवी घटना परळी तालुका राधानगरी जिल्हा कोल्हापूर येथील चर्मकार समाजाच्या वीस वर्षीय तरुणीवर बलात्कार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

चर्मकार समाजाच्या बहिणीला न्याय नाही मिळाला तर दिवाळीनंतर राष्ट्रीय चर्मकार महासंघ रस्त्यावर उतरण्यास देखील तयार आहे. अत्याचार करणाऱ्या दोषींवर व आरोपींना पाठीशी घालत असणाऱ्या पोलिस प्रशासनावर तात्काळ ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून फाशीची शिक्षा देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२० रोजी देण्यात आले. राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक जिल्ह्यात अशा प्रकारचे निवेदन दिले.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने संविधान दिन साजरा







**अमरावती प्रतिनिधी :** देशभरात संविधान दिन साजरा होत असताना राष्ट्रिय चर्मकार महासंघ अमरावती जिल्ह्याच्यावतीने भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभु येथे संविधान उद्देशिकेचे वाचन करून ७१ वा संविधान दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो प्रतिमेचे पूजन करून भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.टाकरखेडा संभु येथील श्रीराम हायस्कूल वर्ग ५ वी चा विद्यार्थी रुद्रेश जामठे यांनी मुखपाठ उद्देशिकेचे वाचन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते कृष्णराव मोहकर हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणुन राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, सामाजिक कार्यकर्ते जानरावजी मोहकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रा.प.सदस्या सौ. सोनाली जामठे तर संचालन सौ.राणीताई मोहकर यांनी केले.यावेळी सुनिल पिंजरकर, गजानन निपाने, राजेश गवई, माजी उपसंरपच सौ.कल्पना मोहकर, सौ.वेणुबाई मोहकर, श्रीमती पुष्पाताई जामठे, सौ.शुभांगी पिंजरकर, राणी मोहकर, सोनाली जामठे, तनुश्री पिंजरकर आदी उपस्थित होते.याप्रसंगी मान्यवरांनी संविधानविषयी आपले मत व्यक्त केले.

## महासंघाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन






भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६४ व्या महापरिनिर्वाण दिनानिमीत्य राष्ट्रीय चर्मकार महासंघ, चारकोप यांच्या वतीने महामानवास अभिवादन करताना चारकोपचे आमदार मा. श्री. योगेश सागर, नगरसेविका व शिक्षण समिती अध्यक्षा सौ. संध्या दोषी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय सल्लागार श्री. पंढरीनाथ पवार, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे, आयोजक श्री. दादाभाऊ माने व सौ. सीमा लोकरे व इतर मान्यवर

# चिखलदरा तालुका अध्यक्षपदी सतिष घोरे यांची निवड



**अमरावती प्रतिनिधी :** चिखलदरा येथील चर्मकार समाजातील सक्रिय सामाजिक कार्यकर्ते सतिष घोरे यांची राष्ट्रिय चर्मकार महासंघाच्या चिखलदरा तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याणमंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशाने राष्ट्रिय प्रवक्ते तथा राष्ट्रिय उपाध्यक्ष रविंद्र राजुसकर,प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड ,विदर्भ प्रमुख गजानन भटकर,अमरावती विभागीय अध्यक्ष डि.आर.माळीसर,रा.का.सदस्य शयामकुमारआकोडे,विभागीय संघटक राजेंद्र तांबेकर यांच्या मार्गदर्शनात जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी चिखलदरा येथे पार पडलेल्या बैठकीत सतिष घोरे यांना नियुक्ती पत्र देवून त्यांचा सन्मान केला.या बैठकीला दिनेश घोरे,रोहीत घोरे,मुन्ना ईदुरकर,गोलु ईदुरकर,मारोती हेकडे,सौ.भुलाई बेलसरे,श्रीमती मिनाबाई घोरे,गायत्री घोरे,सोनम घोरे,सुहाना घोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

चिखलदरा येथे नुकत्याच पार पडलेल्या चर्मकार महासंघाच्या बैठकीमध्ये त्यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली.जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या हस्ते सतिष घोरे यांचा सत्कार करण्यात आला.सतिष घोरे यांच्या कडे याअगोदर शहर अध्यक्ष पदाचीच जबाबदारी होती.परंतु आता तालुका अध्यक्ष जबाबदारी नव्याने यांच्याकडे देण्यात आली आहे.

यावेळी जिल्हा दौऱ्यावर असलेले जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी चर्मकार समाज सघटीत होऊन सक्षम झाला पाहीजे,समाजातील नव युवकाच्या माध्यमातुन समाजाला दिशा देण्याची काळाची गरज असुन ज्ञान विज्ञानाच्या सहाय्याने उद्योग केला पाहीजे तसेच चर्मकार समाजातील युवकाच्या न्याय हक्क मिळवुन देण्याकरिता लढा देवून कार्य करणे आवश्यक असल्याचे मत जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांनी चिखलदरा येथे पार पडलेल्या बैठकीमध्ये व्यक्त केले.

# २६ नोव्हेंबर... संविधान दिन!



**२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संसदेत संविधानाला मान्यता देण्यात आली होती. संविधानाच्या निर्मितीसाठी संविधान सभेनं दोन वर्षे ११ महिने अठरा दिवस या दीर्घकालावधीत संविधान पूर्ण केलं. आपलं संविधान हिंदी आणि इंग्रजी भाषेत हातानं लिहिलं गेलं. यानंतर बिहारी नारायण रायजादा कॅलिग्राफीची कला अवगत असल्यानं ते पुन्हा कॅलिग्राफत लिहिण्याची जबाबदारी त्यांना देण्यात आली. भारतीय राज्यघटना हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. २९ऑगस्ट १९४७ पासून मसुदा समितीनं आपल्या कामकाजास सुरुवात केली.**

संविधान सभेचे प्रमुख जवाहरलाल नेहरू,अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, के. एम. मुन्शी, सय्यद मोहमद सादुल्लाह, बी. एल. मित्तर, डी. पी. खैतान अशा दिग्गज नेत्यांच्या मसुदा समितीने भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला आहे. डिसेंबर १९४६ रोजी घटना समिती गठीत करण्यात आली. सच्चिदानंद सिन्हा या समितीचे हंगामी अध्यक्ष होते. पुढं ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद या समितीचे अध्यक्ष झाले. फाळणीनंतर संविधान सिमितीच्या संदस्यांची संख्या २९२ झाली. समितीच्या ११ बैठका झाल्या. त्या १६५ दिवस चालल्या. समितीच्या १९ उपसमित्या जलद कामकाजाच्या दृष्टीनं कार्यरत होत्या. त्यात मसुदा समिती होती. या महत्त्वाच्या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. या मसुदा समितीच्या ४४ सभा झाल्या.भारतीय राज्यघटना हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय तसेच प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या मूल्यांची राज्यघटनेत बीजे रोवून भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यात आली. मुळ घटनेत १ प्रास्ताविका, ८ अनुसुची, २५ भाग आणि ३९५ कलमे होती. सध्या (जुलै २०१७) मध्ये भारताच्या घटनेत १ प्रास्ताविका, १२ अनुसुची, २५ भाग, ४४८ कलमे, ५ परिशिष्टे आहेत. आतापर्यंत १०१ घटनादुरुस्त्या झाल्या आहेत. २६ जानेवारी, १९५० रोजीच भारतीय संविधानाचा स्वीकार करण्यात आला.भारताचे संविधान बनून तयार होत होते. पण संविधान हे हस्तलिखीत असावं अशी नेहरुंची इच्छा होती. बिहारी नारायण रायजादा कॅलिग्राफीची कला अवगत असल्यानं याची जबाबदारी त्यांना देण्यात आली. संविधान लिहिण्यासाठी २५४ दौत आणि ३०३ पेन वापरण्यात आले. संविधान लिहिण्यासाठी ६ महिने लागले. आचार्य नंदलाल बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शांतिनिकेतनमधील कलाकारांनी भारतीय संविधानातील संपूर्ण हस्तकला पूर्ण केली होती. तसंच प्रास्ताविकाच्या व संविधानाच्या इतर पानांवरील नक्षीकाम व सजावट जबलपूरचे व्यौहार राममनोहर सिन्हा यांनी बनवलेली आहे.

संविधान निर्मितीचा हा पूर्ण इतिहास आपण लक्षात घेतला तर बाबासाहेब संविधान अंमलात येण्याच्या आधीच भारतीय घटनेचे शिल्पकार बनले होते. बाबासाहेबांना भारताच्या राज्य घटनेचे शिल्पकार ठरविण्याचा बहुमान आम जानतेने बहाल केला आहे. डॉ. आंबेडकर भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार.आम्ही त्यांचे ऋणी आहोत व कायम असू.

जय संविधान !
जयभीम !!

**विशाल भाऊ पठारे**
राष्ट्रीय चर्मकार महासंघ

## राष्ट्रिय चर्मकार महासंघ शहर कार्यकारिणी घोषित

# अचलपूर शहराध्यक्षपदी उमेश गायकवाड; परतवाडा शहराध्यक्षपदी अनिल घोरे




**अमरावती प्रतिनिधी :** राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याणमंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशाने राष्ट्रिय प्रवक्ते तथा राष्ट्रिय उपाध्यक्ष रविंद्र राजुसकर,प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड,विदर्भ प्रमुख गजानन भटकर,विभागिय संघटक राजेंद्र तांबेकर,रा.का.सदस्य श्यामभाऊ आकोडे यांच्या मार्गदर्शनात अमरावती जिल्हाध्यक्ष निलेश जामठे व अचलपुर तालुका अध्यक्ष मनोहर कोथळकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन अचलपूर व परतवाडा शहर कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

अचलपुर तालुक्यातील परतवाडा येथील वाघा माता मंदिर, सभागुह येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाची नुकतीच बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये अचलपुर शहर अध्यक्ष म्हणुन उमेश गायकवाड यांची निवड करण्यात आली. तसेच परतवाडा शहर अध्यक्षपदी अनिल घोरे तर डॉ.गजानन रेवसकर यांची परतवाडा शहर सचिव पदी नियुक्ती करण्यात आली.बैठकीचे अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष निलेश जामठे हे होते.बैठकीचे संचालन मनोहर कोथळकर यांनी केले.यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा सहसचिव किशोर पाचखंडे,देवराव रेवसकर,जितुभाऊ घोरे,सौ.शारदा घोरे,सौ.पाचखंडेताई,गिताबाई रेवसकर,प्रतिभा रेवसकर,मोहन वानखडे,प्रदिपभाऊ,अंशु घोरे पदाधिकारी व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

# शहीद जवान स्व.नारायन रेवसकर यांचे वडाळी येथे स्मारक तयार करा!

## राष्ट्रिय चर्मकार महासंघातर्फे ॲड.यशोमतीताई ठाकुर यांना निवेदन





**अमरावती प्रतिनिधी :** राजस्थान सिमेवर तैनात असतांना अमरावती शहराचे सुपुत्र नारायन काशिराव रेवसकर यांना विरमरण आले.त्यांचे स्मारक वडाळी येथील मनपा शाळेच्या खुल्या जागेवर व्हावे अशा आशयाचे निवेदन पालकमंत्री यशोमतीताई ठाकुर यांना राष्ट्रिय चर्मकार महासंघाच्यावतीने जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्या नेत्तुवात देण्यात आले.

शहीद जवान नारायन काशिराव रेवसकर यांनी आपल्या ३५ वर्षांच्या सेवे दरम्यान राजस्थानसह भारत देशाचे मित्रराष्ट्र नेपाळ,म्यानमार, भुटान या देशामध्ये सुध्दा सेवा बजावली आहे. राजस्थान सिमेवर तैनात असतांना वीरगतीस प्राप्त झालेल्या नारायण रेवसकर यांनी देशासाठी बलीदान दिले.त्यांच्यावर शासकिय इतमामात अमरावती येथील वडाळी स्मशानभूमित अंत्यसंस्कार करण्यात आले.वडाळी परिसरातील शहीद जवान नारायन काशिराव रेवसकर यांना राजस्थान बाडमेर येथे देशाची सेवा करित असतांना विरमरण प्राप्त झाले. ज्या शाळेत १ ली ते ४ थी शिक्षन झाले त्यांच शाळेच्या परिसरातील खुल्या मैदानावर स्मारक तयार झाल्यास स्मारकाजवळ स्वातंत्र्यदिन व गणराज्य दिनाचे औचित्य साधून प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करता येतील.त्यामुळे हे स्मारक तयार करण्याबाबत महीला व बाल कल्याणमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री ॲड.यशोमतीताई ठाकुर यांना निवेदन देण्यात आले.निवेदन देतेवेळी जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,माजी महापौर अशोकराव डोंगरे, जिल्हा उपाध्यक्ष जगदेव रेवसकर,शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष गजानन वानरे,सामाजिक कार्यकर्ते रमेश भटकर,सुर्या ग्रुपचे महाराष्ट्र निरिक्षक योगेश भागवतकर,मुलगा प्रशांत रेवसकर उपस्थित होते.

# संत रोहिदास चर्मउद्योग व महात्मा फुले आर्थिक महामंडळाचे विभागीय कार्यालय लातूर येथे स्थापन करा

शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी- संत रोहिदास चर्मउद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे विभागीय कार्यालय लातूर येथे स्थापन करावे या मागणी चे निवेदन मुंबई येथे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांच्याकडे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष बिभीषण सांगवीकर यांनी दिले आहे.

संत रोहिदास चर्मउद्योग व महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे औरंगाबाद येथील कार्यालये लाभार्थ्यांच्या गैरसोईचे असून लातूर येथे स्थापन केले तर पैसा व वेळेची बचत होणार असे निवेदनात म्हटले आहे.ओ.बी.सी.महामंडळ,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ व इतर महामंडळाचे विभागीय कार्यालये लातूर येथे कार्यरत असून त्याच धर्तीवर दोन्ही महामंडळाचे विभागीय कार्यालये लवकरात लवकर स्थापन केले तर लाभार्थाची गैरसोय होणार नाही असे ना.देशमुख यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.